# सभेचे इतिवृत्त

## वर्धा जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समिती दिनांक 09/12/2020 सभेचे इतिवृत्त.

जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समितीची जिल्हास्तरीय कार्यबल समितीची (DLTFC) सभा दिनांक 09.12.2020 रोजी दुपारी 12.00 वाजता मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खाली पार पडलेल्या सभेचे इतिवृत्त.

सदर सभे मध्ये खालील प्रमाणे सदस्य हजर होते.

1. श्री एस.एस.मुददमवार, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समिती वर्धा
2. श्री मिलींद फानखेडकर, (MGIRI),वर्धा
3. श्री निलेश लिंगलवार, निरीक्षक समाज कल्याण, वर्धा
4. श्री प्रशांत मुंद्रे, GST अधिकारी जिल्हा वस्तू व सेवाकर अधिकारी,वर्धा
5. श्री.शशीभूषन वैद्य, लघु उद्योग भारती, संघटना, वर्धा.
6. श्री आयुष सिंघानीया, संस्कार ॲग्रो लि.
7. श्री प्रशांत मिश्रा, पी.व्ही. टेक्सटाईल्स लि.
8. श्री विद्या मानकर, प्रकल्प संचालक, आत्मा वर्धा
9. कु. अश्विनी कोकाटे, व्यवस्थापक तथा सदस्य सचिव (Export Promotion DLTFC) जि.उ.कें.वर्धा.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांचे अनुमतीने खालील बाबी अवगत केल्या.

1. वर्धा जिल्हा हा कापूस व शेती उत्पादनामध्ये अनुकूल असल्यामुळे अन्न प्रक्रिया व खादी तसेच Textile यांची ODOP (One District One Product) म्हणुन निवड करण्याचे लघु उद्योग भारती संघटना, वर्धा चे अध्यक्ष, MGIRI चे प्रतिनीधी यांनी सुचविले होते त्याविषयी चर्चा करण्यात आली.
2. सदस्यांसोबत चर्चा केल्याप्रमाणे District Export Action Plan तयार करण्यात आला व त्याबददल सदस्यांना अवगत करण्यात आले.
3. अध्यक्ष, लघु उद्योग भारती, वर्धा यांनी सुचवल्याप्रमाणे निर्यात बद्दल माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचविण्यासाठी Press note तसेच DGFT च्या सहाय्याने Outreach Programmes आयोजीत करण्यासाठी आराखडा तयार करण्यावर चर्चा झाली.
4. दि. 25.11.2020 च्या सभेमध्ये (Potential) संभाव्य निर्यात प्रचालन उद्योजकांची यादी व सद्यस्थितीत निर्यात करत असलेल्या उद्योजकांची यादी तयार केल्यास पुढील निर्यात प्रोत्साहनाच्या योजना व माहिती देऊन निर्यात वृध्दी होईल. त्या अनुषंगाने व्यवस्थापक, जिउके, वर्धा यांनी DGFT व औद्योगिक संघटनांच्या मदतीने सदर माहिती तयार करावे असे ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे सदर माहिती सदस्यांना देण्यात आली.

5. वर्धा जिल्हयातील वायगाव येथील हळदीसाठी GI (Geographical Indicator tag) प्राप्त झाले असून हळदी प्रक्रिया करीत असलेल्या उद्योंजकांना प्रक्रिया झाल्यानंतर टेस्टींग लॅब व इतर सुविधांची गरज भासल्यास M-GIRI येथे सदर व्यवस्था करता येईल का त्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात आले.
6. वर्धा जिल्हयातील कापूस हे प्रमुख उत्पादन असून कापसावरील प्रक्रिया करुन खादीचे कापड तयार करणारे घटक व ग्रे क्लॉथ (Textile) उद्योग यांना प्रवृत्त करुन जास्तीत जास्त निर्यात वाढ करता येईल यासाठी आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.
7. तसेच निर्यातदारांच्या समस्या व अडचणी याबाबत मा. जिल्हाधिकारी व सदस्यांसोबत चर्चा करण्यात आली.

वरील बाबीवर चर्चा करण्यात आली त्यानंतर सदस्य सचिव यांनी सर्व सदस्याचे आभार मानून सभा संपली असे जाहीर केले.

व्यवस्थापक,तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र,वर्धा.